महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३६० वा | दिनांक : १४/१२/२०२५ | वार : रविवार

## एकनाथ शिंदे दोन महिन्यांत पुन्हा मुख्यमंत्री होणार -प्रकाश आंबेडकर यांची मोठी भविष्यवाणी



**मुंबई :** राज्यातील महायुतीमध्ये झालेल्या अंतर्गत कलहाच्या आणि नाराजीच्या नाट्यानंतर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी अत्यंत खळबळजनक भाकीत वर्तवले आहे. "उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपली ताकद दाखवून दिली असून त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना खिशात घातले आहे. येत्या एक ते दोन महिन्यांत एकनाथ शिंदे पुन्हा राज्याच्या मुख्यमंत्रिपदावर विराजमान होतील," असा दावा आंबेडकर यांनी केल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये होणाऱ्या मेगा भरतीमुळे शिंदे गटाची कोंडी झाली होती. या नाराजीतून शिंदे गटाच्या मंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कारही टाकला होता. यानंतर शिंदेंनी तडकाफडकी दिल्ली गाठून अमित शाह यांची भेट घेतली. सुरुवातीला महापालिका निवडणुका वेगळे लढणार असल्याचे भाजप सांगत होती. मात्र, आता युती करून लढू असे आता म्हणत आहेत. आता या सर्व पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांनी मोठे भाकित केले.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, "एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा स्वतःची 'पॉवर' काय आहे, हे भाजपला दाखवून दिले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढण्याची भाषा करणाऱ्या भाजपला आता माघार घ्यावी लागणार आहे. शिंदेंची ही किमया असून त्यांनी अमित शाह यांच्यासारख्या नेत्यालाही खिशात घातले आहे. त्यामुळे आता भाजपला शिंदे गटासोबत युती करूनच निवडणुका लढाव्या लागतील."

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री न करता उपमुख्यमंत्रीपद देण्यात आले. "शिंदेंना मुख्यमंत्री केले नाही, त्याचा हा बदला असावा. शिंदेंनी जी खेळी खेळली आहे, त्यावरून ते येत्या महिना-दोन महिन्यांत पुन्हा मुख्यमंत्री होतील, असेच चित्र दिसत आहे," असे आंबेडकर यांनी स्पष्ट केले.

काही दिवसांपूर्वीच एकनाथ शिंदे आणि शरद पवार यांची भेट झाली होती. या भेटीचा संदर्भ देत आंबेडकर म्हणाले, "शरद पवार हे राजकारणातील चाणक्य आहेत. शिंदे आणि पवार यांच्या भेटीतून शिंदेंनी भाजपला योग्य तो संदेश दिला आहे. अमित शाह यांना झुकवण्यामागे या भेटीचाही संदर्भ असू शकतो."

दरम्यान, प्रकाश आंबेडकरांच्या या विधानामुळे महायुतीमध्ये नक्की काय शिजतंय आणि भविष्यात मुख्यमंत्रीपदात बदल होणार का? या चर्चांना उधाण आले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सर्वात मोठे 'ब्लॅकमेलर' - राजू शेट्टींचा घणाघात



**पंढरपूर :** "मुख्यमंत्री सहाय्यता निधीला १५ रुपये द्या, नाहीतर तुमच्या कारखान्यातील 'काटामारी' (वजनातील घोळ) बाहेर काढू, असे म्हणणारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच सर्वात मोठे ब्लॅकमेलर आहेत," असा सणसणीत आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केला आहे. पंढरपूर तालुक्यातील वाखरी येथे ऊस दरासाठी सुरू असलेले आमरण उपोषण सोडवल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

ऊसाला पहिली उचल साडेतीन हजार रुपये मिळावी, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे समाधान फाटे आणि त्यांचे सहकारी गेल्या सहा दिवसांपासून वाखरी येथे आमरण उपोषणाला बसले होते. आंदोलनाच्या दबावामुळे जिल्ह्यातील १५ हून अधिक साखर कारखान्यांनी पहिली उचल म्हणून ३ हजार रुपये देण्याचे मान्य केले आहे. या विजयानंतर राजू शेट्टी आणि रविकांत तुपकर यांनी आंदोलकांना लिंबू पाणी देऊन त्यांचे उपोषण मागे घेतले. यावेळी बोलताना राजू शेट्टी यांनी मुख्यमंत्री फडणवीसांवर घणाघात केला.

यावेळी बोलताना राजू शेट्टी यांनी राज्य सरकार आणि साखर कारखानदारांवर जोरदार टीका केली. ते म्हणाले, "एकिकडे हे सरकार एफआरपीचे (FRP) तुकडे पाडण्यासाठी न्यायालयात कारखानदारांची बाजू घेऊन लढत आहे. मात्र, दुसरीकडे स्वाभिमानीच्या आंदोलनामुळे कोल्हापूर, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातील तब्बल ५१ कारखान्यांना ३ हजार रुपयांपेक्षा जास्त दर देणे भाग पडले आहे. शेतकऱ्यांना एफआरपीपेक्षा जास्त रक्कम मिळवून देणे, हा स्वाभिमानीचा मोठा विजय असून कारखानदार आणि सरकारचा हा नैतिक पराभव आहे."

सोलापूर जिल्ह्यात ज्या कारखान्यांनी अद्याप ३ हजार रुपये दर जाहीर केलेला नाही, त्यांना शेट्टी यांनी कडक इशारा दिला आहे. "ज्यांनी दर दिला नाही, त्या कारखान्यांच्या गव्हाणीत उड्या मारून कारखाने बंद पाडण्याचे आंदोलन सुरूच राहील," असा निर्धार राजू शेट्टी यांनी केला.

गेले सहा दिवस शेतकरी अन्नान्न दशेने उपोषण करत असताना सरकारला त्यांच्याकडे लक्ष द्यायला वेळ मिळाला नाही. मुख्यमंत्र्यांना फक्त कारखानदारांकडून १५ रुपये वसूल करण्यात रस आहे. चोरी (काटामारी) पकडल्यावर कारवाई करण्याऐवजी तोडपाणी करणे हे ब्लॅकमेलिंग नाही तर काय आहे?" असा सवालही शेट्टी यांनी उपस्थित केला.

## 'लाडक्या बहिणीं'साठी महत्त्वाची बातमी : e-KYC दुरुस्तीसाठी मिळणार एकच संधी, महिलांनी काळजीपूर्वक माहिती भरावी




**मुंबई :** राज्य सरकारने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतील लाखो लाभार्थी महिलांना मोठा दिलासा दिला आहे. अर्ज भरताना किंवा ई-केवायसी (e-KYC) प्रक्रिया पूर्ण करताना अनावधानाने झालेल्या चुका सुधारण्यासाठी आता राज्य सरकारने अंतिम संधी उपलब्ध करून दिली आहे. त्यानुसार, लाभार्थी महिलांना आता ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ई-केवायसीमधील त्रुटी दुरुस्त करता येणार आहेत. राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी ही माहिती दिली आहे.

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना ही राज्य सरकारची अत्यंत लोकप्रिय आणि महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेचा लाभ घेणाऱ्या बहुतांश लाभार्थी महिला या ग्रामीण आणि दुर्गम भागातील आहेत. अनेकदा तांत्रिक माहितीचा अभाव, नेटवर्कच्या समस्या किंवा घाईगडबडीमुळे ई-केवायसी करताना महिलांकडून चुका झाल्याचे निदर्शनास आले होते. अशा चुकांमुळे अनेक पात्र लाभार्थी लाभापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली होती.

या पार्श्वभूमीवर, ई-केवायसीमध्ये सुधारणा करण्याची संधी मिळावी, अशी मागणी करणारी अनेक निवेदने महिला व बालविकास विभागाला प्राप्त झाली होती. या मागण्यांची गंभीर दखल घेत आणि महिलांच्या सोयीसाठी सरकारने हा संवेदनशील निर्णय घेतला आहे. आता 31 डिसेंबरपर्यंत पोर्टलवर जाऊन महिलांना त्यांच्या ई-केवायसी अर्जात 'एकदाच' सुधारणा करता येईल. ही शेवटची संधी असल्याने महिलांनी काळजीपूर्वक माहिती भरावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

केवळ केवायसी नोंदणीसाठी मुदतवाढच नाही, तर विभागाने आणखी एक महत्त्वपूर्ण तांत्रिक बदल केला आहे. ज्या लाभार्थी महिलांचे पती हयात नाहीत किंवा ज्यांचे वडील हयात नाहीत, अशा महिलांना ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करताना अनेक अडचणी येत होत्या. या समस्येचे निराकरण करण्यासाठी आता पोर्टलवर विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे या घटकातील महिलांनाही आता आपली नोंदणी प्रक्रिया विनासायास पूर्ण करता येणार आहे.

सदर योजना ही महिला सक्षमीकरणाच्या उदात्त हेतूने राबविण्यात येत आहे. तांत्रिक कारणांमुळे किंवा छोट्याशा चुकीमुळे कोणत्याही पात्र लाडक्या बहिणीला लाभापासून वंचित राहावे लागू नये, हीच शासनाची भूमिका आहे. ही प्रक्रिया अधिक सुलभ व सोपी असावी, जास्तीत जास्त लाडक्या बहिणींना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळावा यासाठी महिला व बालविकास विभाग कटिबद्ध आहे, असे अदिती तटकरे यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १४ डिसेंबर २०२५


## इकरा पब्लिक स्कूलमध्ये एनडीए परीक्षा मार्गदर्शन सत्र



**जळगाव :** इकरा पब्लिक स्कूलने अलीकडेच नॅशनल डिफेन्स अकादमी (NDA) परीक्षेबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी एका मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात सुभेदार मेजर ए.आर. कत्रे, एक प्रसिद्ध तज्ञ, उपस्थित होते, ज्यांनी परीक्षेची पद्धत, फायदे आणि परीक्षेनंतरच्या संधींबद्दल मौल्यवान माहिती दिली.सुभेदार कत्रे यांच्या मते, एनडीए परीक्षा हे भारतीय सशस्त्र दलांमध्ये प्रतिष्ठित करिअर करण्यासाठी एक प्रवेशद्वार आहे. त्यांनी स्पष्ट केले की ही परीक्षा केंद्रीय लोकसेवा आयोगाद्वारे (UPSC) वर्षातून दोनदा घेतली जाते आणि ज्या विद्यार्थ्यांनी १०+२ परीक्षा उत्तीर्ण केली आहे, ते या परीक्षेसाठी पात्र असतात.या चर्चासत्रात परीक्षेच्या महत्त्वाच्या पैलूंवर चर्चा करण्यात आली, ज्यात परीक्षेची पद्धत, पात्रतेचे निकष आणि निवड प्रक्रिया यांचा समावेश होता. परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या विविध करिअर मार्गांची माहिती देण्यात आली, ज्यात सैन्यदल, नौदल आणि वायुदलातील पदांचा समावेश आहे.सुभेदार कत्रे यांनी विद्यार्थ्यांच्या सामान्य शंका आणि प्रश्नांची उत्तरे दिली, ज्यामुळे त्यांना परीक्षा आणि तिच्या संधींबद्दल अधिक स्पष्ट समज मिळाली. संरक्षण दलात सामील होऊन देशाची सेवा करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रेरित करणे आणि मार्गदर्शन करणे हा या चर्चासत्राचा उद्देश होता.या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला,ज्यांनी सुभेदार कत्रे यांनी दिलेल्या मौल्यवान माहिती आणि मार्गदर्शनाची प्रशंसा केली. शाळा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि करिअरच्या वाटचालीत त्यांना मदत करण्यासाठी अशा प्रकारचे आणखी चर्चासत्रे आणि कार्यशाळा आयोजित करण्याची योजना आखत आहे.

## जागृत मारोती मंदीर शफेपूर येथे अखंड हरीनाम सप्ताहास प्रारंभ



**कन्नड (अरुण थोरात) :** पिशोर येथील शेफेपूर भागातील जागृत मारुती मंदिर येथे सालाबाद प्रमाणे याही वर्षी दि.१४ डिसेंबर पासून अखंड हरिनाम सप्ताह प्रारंभ झाला आहे. यात या शिव महापुराण २:०० ते ५:०० कथा प्रवक्ते गुरुवर्य भानूदास महाराज चातुर्मास अनवेकर सप्ताहाची सांगता काल्याचे कीर्तनाने दि .२१ रोजी होणार आहे. या सप्ताहात सकाळी चार ते सहा काकडा सात ते दहा ज्ञानेश्वरी पारायण व दुपारी ११ ते ०२ शिव महापुराण कथा ०५ ते ०७ हरीपाठ व रात्री ०८: ३० ते ११ पर्यंत किर्तन व हरीजागर होईल, व्यासपीठाचे वाचक पुढील प्रमाणे- हभप. एकनाथ सपकाळ, हभप. सूर्यकांत मोकासे, हभप. विष्णू मोकासे, हभप. काळुबा ओपळकर व हभप. विठोबा मोकासे हे ज्ञानेश्वरी चे वाचक आहेत. तसेच या अखंड हरिनाम सप्ताहात महाराष्ट्रातील नामांकित विचारवंत, कीर्तनकारांचे अमृततुल्य वाणीतून विचार श्रवण करण्यास मिळणार आहेत. दि. १४ डिसेंबर रविवार रोजी हभप. समाधान महाराज शर्मा, दि.१५ रोजी हभप. अर्जुन महाराज मोटे परभणी, दि. १६ रोजी हभप. विशाल महाराज खोले मुक्ताईनगर, दि. १७ रोजी हभप. संजय बाबा पाचपोर विदर्भ रत्न, दि. १८ रोजी हभप. संग्राम बापू भंडारे पुणे, दि. १९ रोजी हभप संतोष वनवे बीड, दि. २९ रोजी हभप. ज्ञानेश्वर माऊली कदम आळंदी, व दि. २१ रविवार रोजी हभप. गुरुमाऊली बाबा महाराज चातुर्मासे अनवे यांच्या काल्याचे किर्तनाने सांगता होणार आहे. व दुपारी दोन ते चार महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. मृदंगाचार्य हभप गिरजानाथ महाराज जाधव, हभप महेश महाराज कावले व गायनाची साथ हभप. कृष्णा महाराज मोरे, हभप. शंकर महाराज साबळे, व हभप शंकर महाराज अनपड हे गायनाचार्य असणार आहेत. दरम्यान दि. १८ गुरुवार रोजी सकाळी दहा ते तीन वाजेपर्यंत सर्व मोफत रोग निदान शिबिर विशेष आयोजन व यात तज्ञ डॉक्टर एम आय टी हॉस्पिटलचे असणार आहे. मंगळवारी कुमारी हर्षदाताई ठाकूर हिंदुजागरण मंच यांचे व्याख्यान दुपारी बारा ते दोन या दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. तरी या सर्व गुण संपन्न अखंड हरिनाम सप्ताहाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आव्हान शफेपूर पंच कमिटी व ग्रामस्थांनी केला आहे.

## ६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेचा निकाल जाहीर

**छत्रपती संभाजीनगर :** ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत बीड केंद्रातून नाट्यांकूर, जालनाया संस्थेच्या ती या नाटकाला प्रथम पारितोषिक तसेच ज्ञानज्योत शिक्षण संस्था, जालना या संस्थेच्या टेक अ चान्स या नाटकास द्वितीय पारितोषिक जाहीर झाल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य संचालक श्री. बिभीषण चवरे यांनी आज एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली आहे. या दोन्ही नाटकांची अंतिम फेरीसाठीही निवड करण्यात आली आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे छत्रपती संभाजीनगर केंद्रावरील अन्य निकाल पुढीलप्रमाणे-सुंदरेश्वर बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, जालना या संस्थेच्या उत्क्रांत या नाटकासाठी तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. दिग्दर्शन प्रथम पारितोषिक सुमित शर्मा (नाटक- ती), द्वितीय पारितोषिक रत्नदीप वाव्हळे (नाटक- टेक अ चान्स), तृतीय पारितोषिक विनायक पाटील (नाटक- उत्क्रांत) प्रकाश योजना प्रथम पारितोषिक वाहिमक जाधव (नाटक-उत्क्रांत), द्वितीय पारितोषिक प्रसाद वाघमारे (नाटक-हिरण्यकश्यपू), तृतीय पारितोषिक अभय एरंडे (नाटक-केस नं. ९९) नेपथ्य प्रथम पारितोषिक रामेश्वर देवरे (नाटक-उत्क्रांत), द्वितीय पारितोषिक बबन राऊत (नाटक-विठ्ठल विठ्ठल) तृतीय पारितोषिक अमोल जाधव (नाटक- टेक अ चान्स) रंगभूषा : प्रथम पारितोषिक वर्षाराणी कोळवले (नाटक- ती), द्वितीय पारितोषिक अजित सकपाळ (नाटक-विठ्ठल विठ्ठल) तृतीय पारितोषिक कविता दिवेकर (नाटक- उत्क्रांत) संगीत दिग्दर्शन प्रथम पारितोषिक अभिनय जाधव (नाटक- हिरण्यकश्यपू), द्वितीय पारितोषिक निलेश सपकाळ (नाटक-ती) तृतीय पारितोषिक सौरभ मांडवकर (नाटक-उत्क्रांत) वेशभूषाः प्रथम पारितोषिक कविता दिवेकर (नाटक-उत्क्रांत), द्वितीय पारितोषिक संध्या शर्मा (नाटक-ती), तृतीय पारितोषिक अजित सपकाळ (नाटक- विठ्ठल विठ्ठल) उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक सुमित शर्मा (नाटक-ती) व मुक्ता वळसे (नाटक- टेक अ चान्स) अभिनयासाठी गुणवत्ता प्रमाणपत्रे जगदीश जाधव (नाटक- टेक अ चान्स), सतिश लिंगडे (नाटक-ती), प्रमोद रामदासी (नाटक-उंच माझा झोका), कपिल शेडगे (नाटक-ती), बळवंत देशपांडे (नाटक- बातमी तशी जूनी पण), मेघा खरबडे (नाटक- विठ्ठल विठ्ठल), सम्राज्ञी शिरोळकर (नाटक-चल ऐश कर लो), पद्मजा चाटोरीकर (नाटक- ऑपरेशन गंगा), मानसी अलाट (नाटक-पारध), हेमा धामुणे (नाटक-हिरण्यकश्यपू)दि. ६ नोव्हेंबर, २०२५ ते १० डिसेंबर, २०२५ या कालावधीत तापडिया नाट्यमंदिर, छत्रपती संभाजीनगर आणि यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे अतिशय जल्लोषात झालेल्या या स्पर्धेत एकूण २० नाट्यप्रयोग सादर करण्यात आले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्री. देवदत्त पाठक, श्री. संजय देखणे आणि श्रीमती ज्योती निसळ यांनी काम पाहिले.सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या नाटकांच्या संघांचे तसेच इतर पारितोषिक प्राप्त कलाकारांचे अभिनंदन केले.राज्य नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत सहभागी झालेल्या सर्व संस्था आणि कलाकार यांनी मेहनत घेऊन सादर केलेल्या सर्व दर्जेदार नाटकांना प्रेक्षकांनी चांगली दाद दिली. भविष्यातही संस्था व कलाकारांनी सर्वोत्तम कामगिरी करावी, अशी अपेक्षा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी व्यक्त केलेली आहे.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १४ डिसेंबर २०२५


## 'डिजिटल ग्रंथालय आणि पर्यावरण संरक्षण' या विषयावर जयभवानी महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळा संपन्न




**पाटोदा (प्रतिनिधी) :** दि.१३डिसेंबर : पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या ग्रंथालय विभाग आणि वनस्पतीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शनिवार,दि. १३ दिसेंबर २०२५ रोजी ‘डिजिटल ग्रंथालय आणि पर्यावरण संरक्षण’ या विषयावरती एक दिवसीय कार्यशाळा महाविद्यालयात संपन्न झाली. याप्रसंगी भारतीय ग्रंथपालनशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांना अभिवादन करण्यात आले. ‘डिजिटल ग्रंथालय आणि पर्यावरण संरक्षण’ या एक दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. विश्वास कदम, श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज् महाविद्यालय, शिवाजीनगर गढी यांनी केले. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा विभाग शिवाजी महाविद्यालय, परभणी येथील प्रा.डॉ.बापूसाहेब भोसले, हे होते तर व्यासपिठावर अंतर्गत मुल्यमापन हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक तसेच प्रा. डॉ. सुनील जाधव, कनिष्ट विभाग प्रमुख प्रा. सतीश जरांगे यांची उपस्थिती होती. उद्घाटनपर भाषणात बोलताना प्राचार्य डॉ.विश्वास कदम म्हणाले कि, डिजिटल युगात ग्रंथालयांची बदलती भूमिका अधोरेखित करत पर्यावरणपूरक विचारसरणीसाठी डिजिटल ग्रंथालये कशी उपयुक्त ठरतात यावर प्रकाश टाकला. कागदविरहित कार्यपद्धती, ऑनलाइन माहिती साठवण आणि ज्ञानप्रसार यामुळे पर्यावरण संवर्धनास चालना मिळते, असे त्यांनी नमूद केले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. ज्योती रकटे यांनी केले. प्रास्ताविकात कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. संरक्षणाच्या दृष्टीने डिजिटल ग्रंथालयांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पेपरलेस ग्रंथालयामुळे पर्यावरण संरक्षणाला मोठी मदत होते. कागदाचा वापर कमी झाल्याने वृक्षतोड थांबवण्यास हातभार लागतो. तसेच माहिती शोधणे, जतन करणे व शेअर करणे अधिक सोपे, वेगवान आणि अचूक होते. संगणक, टॅबलेट, मोबाईल किंवा इंटरनेटच्या साहाय्याने वाचकांना कुठूनही व कधीही माहिती मिळू शकते असे सांगितले. यानंतर अंतर्गत मुल्यमापन हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक यांनी कार्यशाळेत बोलत असताना पर्यावरण संरक्षणासाठी जनजागृती निर्माण करण्यात ग्रंथालये आणि शैक्षणिक संस्था यांची महत्त्वाची जबाबदारी असून, डिजिटल साधनांच्या माध्यमातून ही जबाबदारी अधिक प्रभावीपणे पार पाडता येते, असे त्यांनी सांगितले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असताना प्रा.डॉ.बापूसाहेब जीवनराव भोसले म्हणाले कि, आजच्या डिजिटल युगात पेपरलेस लायब्ररी ही शाश्वत विकासाची संकल्पना असून शिक्षण, संशोधन आणि ज्ञानप्रसारासाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. पर्यावरणीय समस्यांची सद्यस्थिती मांडत शाश्वत विकासासाठी माहिती तंत्रज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले. डिजिटल ग्रंथालयांमधील ई-पुस्तके, संशोधन लेख, डेटाबेस आणि ऑनलाइन शैक्षणिक साधने विद्यार्थ्यांना पर्यावरणविषयक अद्ययावत माहिती सहज उपलब्ध करून देतात, असे त्यांनी सांगितले. पर्यावरण संरक्षणासाठी संशोधन, शिक्षण आणि जनजागृती यामध्ये डिजिटल माध्यमांचा योग्य वापर काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. अध्यक्षीय सामारोपात बोलत असताना प्रा. डॉ. सुनील जाधव म्हणाले कि, डिजिटल ग्रंथालये आणि पर्यावरण संरक्षण यांचा परस्पर संबंध स्पष्ट करत, प्रत्येक विद्यार्थ्याने आणि शिक्षकाने पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारावी, असे आवाहन त्यांनी केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती व सामाजिक बांधिलकी वाढते, असे त्यांनी नमूद करून आयोजकांचे अभिनंदन केले. या कार्यशाळेच्या प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. अशोक देवगुडे यांनी करून दिला. या कार्यशाळेचे सुत्रसंचलन प्रा. डॉ. बी. बी. लोखंडे यांनी केले तर आभार प्रा. बाळासाहेब जोशी यांनी मानले. या कार्यशाळेला सर्व प्राध्यापक, वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थीनी आपला सहभाग नोंदवला.

## जिजामाय

स्वराज्याची माता
रयतेची दाता
सह्याद्रीची त्राता
जिजामाय..

मराठी माउली
वादळ खंबीर
संस्कार सागर
जिजामाय..

छत्रपती पाठी
कणखर धीट
उभे विद्यापीठ
जिजामाय..

मराठी मातीत
सिंहाची गर्जना
जगाची प्रेरणा
जिजामाय..

शिवराज्य होता
कृतार्थ जाहली
भरून पावली
जिजामाय..



**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड

## थंडीच्या दिवसात

थंडीच्या दिवसात
होतात सर्वांचे हाल
कुणी पांघरते ब्लँकेट
कुणी पांघरते शाल

थंडीच्या दिवसात
आजोबा पेटवितात शेकोटी
हात पाय शेकत
सांगतात आम्हाला गोष्टी

थंडीच्या दिवसात
आई घालते स्वेटर
बाबा बांधतात
उलनची मफलर

थंडीच्या दिवसात
उशीरा उठतो दादा
आई बाबाचे टोमणे
खातो सदा न कदा

थंडीच्या दिवसात
मी मात्र लवकर उठतो
भल्यापहाटे आंघोळ करून
शाळेला पळत सुटतो



• **रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १४ डिसेंबर २०२५


## जिंतूर येथे मतपेटी निगराणीसाठी पक्ष कार्यकर्ते नियुक्त



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** जिंतूर पासून तीन किलोमीटर अंतरावर आयटीआय कॉलेज असून या ठिकाणी मतपेट्यांचे स्ट्रॉंग रूम आहे. याच ठिकाणी मतमोजणी होणार आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे दररोज दोन - दोन कार्यकर्ते मतपेटीच्या ठिकाणी नियुक्त करण्यात आले आहेत.मतमोजणीला २१ तारखेपर्यंत वेळ असल्याने कार्यकर्त्यांनी संशय व्यक्त केल्याने माजी आमदार विजय भांबळे यांनी याबाबत स्थानिक प्रशासनाची चर्चा करून या ठिकाणी दररोज दोन कार्यकर्ते नियुक्त केले. यासाठी प्रशासनाने परवानगी दिली आहे. स्ट्रॉंगरूमच्या बाहेर सीसीटीव्ही कॅमे-याच्या स्क्रीन समोर हे दोन कार्यकर्ते थांबून निगराणी करत आहेत. मतपेट्या असलेल्या स्ट्रॉंगरूम बाहेर सुरक्षेसाठी २५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नऊ एसआरपीचे जवान व १६ पोलीस असे २५ जण मतपेटीच्या सुरक्षेसाठी नियुक्त असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी शैलेस लाहोटी यांनी दिली. २१ डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होणाऱ्या असल्याचे शैलेस लाहोटी यांनी सांगितले.

# जिल्हा परिषदेच्या शिक्षकांचे स्टेम आधारित प्रशिक्षण संपन्न



**कन्नड (अरुण थोरात) :** जिल्हा परिषदेच्या शिक्षकांसाठी स्टेम (STEM) आधारित प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. हे प्रशिक्षण एआयएफ(AIF) च्या माध्यमातून आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचा उद्देश शिक्षकांना नवीन शिक्षण पद्धती आणि तंत्रज्ञानाची माहिती देणे हा होता.या प्रशिक्षणामध्ये शिक्षकांना स्टेम विषयातील नवीनतम विकास आणि त्यांच्या शिक्षणात त्याचा कसा वापर करावा याबद्दल माहिती देण्यात आली. प्रशिक्षणामध्ये प्रयोगात्मक शिक्षण, समस्या सोडवणे आणि समीक्षात्मक विचार यावर भर देण्यात आला होता.हे प्रशिक्षण शिक्षकांना त्यांच्या शिक्षणात नवीन दृष्टिकोन आणि तंत्रज्ञानाचा वापर करण्यास मदत करेल, ज्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगले शिक्षण मिळेल.सदर कार्यक्रम DIET छत्रपती संभाजी नगर, जिल्हा परिषद व अमेरिकन इंडिया फाउंडेशन मार्फत घेण्यात आला. संस्थेचे कार्यक्रम समन्वयक शाम उगले यांनी चांगले आयोजन केले, तसेच शेजुल, झाडे, दरेकर, शिनगारे, पोटे या सर्वांनी २१ व्या शतकातील कौशल्य, कोडिंग, स्टेम, वित्तीय साक्षरता,अवकाश तंत्रज्ञान, स्टेम इलेक्ट्रॉनिक इत्यादी विषयांवर सविस्तर माहिती खेळीमेळीच्या वातावरणात दिली.सदर प्रशिक्षनास पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी श्रीम. सबाहत, विस्तार अधिकारी मनिष दिवेकर, विशेष शिक्षक नितिन वाघ, के.आर.भुसारी, केंद्र शाळा कन्नडचे मुख्याध्यापक सतिष कोळी आदी उपस्थित होते.

## 'जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चिंचोली येथे संपादक आपल्या भेटीला'



**चिंचोली :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,चिंचोली केंद्र बिडकीन,तालुका पैठण,जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथे 'संपादक आपल्या भेटीला' हा कार्यक्रम घेण्यात आला मुंबई लोकमत वृत्तपत्राचे सहाय्यक संपादक श्री पवन देशपांडे ह्यांनी चिंचोली शाळेला भेट दिली.वृत्तपत्र कसे चालते,तेथील कामकाज कसे केले जाते.वृत्त संकलन ते वृत्तपत्र वितरण ह्या सर्व बाबींची माहिती पवन देशपांडे ह्यांनी सर्व विद्यार्थ्यांना दिली.संपादक,वार्ताहर,वितरक, फोटोग्राफर इत्यादी पदासाठी कोणते शिक्षण घ्यावे लागेल याविषयीची सर्व माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या त्यांच्या मनातल्या प्रश्नांची उत्तरे पवन देशपांडे ह्यांनी दिली.वृत्तपत्रांचे नियमित वाचन करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला.ह्यावेळी मुख्याध्यापक श्री अरविंद उमाळे, सहशिक्षक श्री जयवंत बनकर, सहशिक्षिका कस्तुरी कुलकर्णी ह्यांची उपस्थिती होती.


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १४ डिसेंबर २०२५


## सायखेडा येथील संशयास्पद मृत्यूप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी





**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर तालुक्यातील मंगरूळ तांडा येथील दीपक हरिभाऊ राठोड यांच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी चारठाणा पोलीस ठाण्यात त्वरित गुन्हा दाखल करावा, तसेच निष्पक्ष तपास सुरू करावा, अशी लेखी मागणी मृतकाचा भाऊ प्रदीप राठोड यांनी परभणीचे माननीय पोलीस अधीक्षक यांच्याकडे केली आहे. १० डिसेंबर रोजी हे निवेदन एसपी कार्यालयात दाखल झाले.दि. १५ सप्टेंबर २०२५ रोजी दीपक राठोड यांचा मृतदेह चारठाणा हद्दीतील सायखेडा शिवारातील शेतातील विहिरीत आढळून आला होता. मृत्यूच्या परिस्थितीवरून घातपाताचा संशय व्यक्त करत कुटुंबीयांनी अप्राकृतिक मृत्यूची नोंद करीत युडी क्र. ००१५/२०२५ ची नोंद झाली. त्यानंतर त्यांचे शवविच्छेदन करण्यात आले. काही दिवसांपूर्वी पोलीस स्टेशनला प्राप्त झालेल्या पोस्टमार्टम अहवालात मृत्यूसंदर्भातील नमूद कारणे घातपाताकडे निर्देश करणारी असल्याचे प्रदीप राठोड यांनी निवेदनात म्हटले आहे.मात्र, अहवाल प्राप्त झाल्यानंतरही चारठाणा पोलीस स्टेशनकडून गुन्हा दाखल करण्यात विलंब होत असल्याचा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला आहे. “वरिष्ठांचे आदेश येणे बाकी”, “अजून अभ्यास करावा लागेल” अशा उडवाउडवीच्या कारणांमुळे गुन्हा दाखल न करता तपास टाळला जात असल्याचे प्रदीप राठोड यांचे म्हणणे आहे. त्यामुळे कुटुंबीयांमध्ये तीव्र नाराजी असून न्याय मिळण्याबाबत चिंता वाढली आहे.निवेदनात— युडि क्र. ००१५/२०२५ प्रकरणी योग्य त्या कलमान्वये तातडीने गुन्हा दाखल करणे, निष्पक्ष व त्वरीत तपास हाती घेणे आणि गुन्हा दाखल करण्यात झालेल्या दिरंगाईबाबत चौकशी करून संबंधित पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करणे—अशा तीन प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. कुटुंबीयांनी हा प्रकार कायद्याचे उल्लंघन असून न्याय प्रक्रियेत अडथळा निर्माण करणारा असल्याचा आरोप करत तातडीने कारवाईची अपेक्षा व्यक्त केली आहे.दिलेल्या निवेदनावर प्रदीप हरिभाऊ राठोड यांची स्वाक्षरी आहे






## दिग्रस बुद्रुक मध्ये मोठी कारवाई! अवैध्य वाळू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण.



**बुलढाणा (महेश मुंढे) :** याबाबत सविस्तर माहिती अशी की आंढेरा पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या दिग्रस बुद्रुक परिसरात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या अवैध वाळू साठवणूक आणि अवैध वाळू वाहतूक प्रकरणी अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयाच्या पथकाने ११/ १२/ २०२५ रोजी पहाटे विशेष छापे टाकले या कारवाईत सुमारे रु. १,०५,८५०००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. फिर्यादी काशिनाथ भगवान इप्पर वय ५३ मंडळ अधिकारी तहसील कार्यालय देऊळगाव राजा जिल्हा बुलढाणा यांच्या लेखी तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली. दिनांक ११/ १२ /२०२५ रोजी पहाटे पहाटे ०२:०० ते ०४:०० वाजता दिग्रस बुद्रुक येथे छापे टाकण्यात आले तीन पंचनाम्यांद्वारे चारही आरोपींच्या ठिकाणाहून पुढील प्रमाणे मुद्देमाल आढळून आला, (१) उमेश आत्माराम पऱ्हाड रा. दिग्रस बुद्रुक गट क्र. ४५० मधील जागेतून २५ ते ३० ब्रास रेती साठा किं. ₹१,५०,०००/ एक JCB मशीन किं. ७,००,०००/ टिप्पर क्र.१- Mh २८ ab ६७३९ किं. १२,००,०००/ टिप्पर क्र. २ - mh १२ rn ३६६५ किं. १२,००,०००/ टिप्पर क्र. ३ विना क्रमांक किं. १२,००,०००/ (२) धनंजय नारायण मिसाळ रा. दिग्रस बुद्रुक यांच्या जागेतून ५ ते १० ब्रास अवैधर्यती साठा किं. ५०,०००/ टिप्पर क्र. १- mh २८ bb ८१३९ किं. १२,००,०००/ टिप्पर क्र. २- विना क्रमांक किं. १२,००,०००/ (३) रवींद्र भास्कर लाड रा. दिग्रस बुद्रुक यांच्या घराशेजारून पाच ब्रास अगोदर रेती साठा किं. २५,०००/ टिप्पर क्र. १-mh २८ bb ३१९८ किं. १२,००,०००/ टिप्पर क्र. २ - mh २० eg ९२७७ किं. १२,००,०००/ टिप्पर क्र.३ - विना क्रमांक किं. १२,००,०००/(४) भरत संजय पऱ्हाड रा. दिग्रस बुद्रुक यांच्या जागेतून १० ते १२ ब्रास अवैध रेती साठा किं. ६०,०००/ असा एकूण रुपये १,०५,८५,०००/ किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अवधरेती साठवणूक व वाहतुकीबाबत कलम ३०३(२) BNS सह कलम ४८(७),४८(८), महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ अन्वये संबंधित चौघा आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे हे. कॉ. रावसाहेब मुंढे ब. नं. ७५० यांनी गुन्हा दाखल केला व या कारवाईत तपास अधिकारी म्हणून पो. उप. नि. दिनेश घुगे हे होते. या संपूर्ण कारवाईमुळे दिग्रस बुद्रुक परिसरातील अवैध रेती उत्खनन व वाहतूक रॅकेटला मोठा धक्का बसला आहे,विभागीय आयुक्त कार्यालय, महसूल विभाग आणि पोलीस यंत्रणा यांच्या संयुक्त कारवाईने कोट्यावधींचा मुद्देमाल जप्त झाला असून या प्रकरणादरम्यान तपास अधिकारी पो. उप. नि. दिनेश घुगे यांच्यामार्फत पुढील तपास वेगाने सुरू असून अवैधरित व्यवसायातील इतर व्यक्तींचा सहभाग, वाहतूक साखळी आणि स्थानिक नेटवर्क याबाबतची माहिती पडताळून पाहिली जात आहे या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे कारण या अवैध धंद्यासाठी अजून नवीन १० ते १२ हायवा टिप्पर चे बुकिंग झाले असल्याची गोपनीय माहिती स्थानिक प्रशासनाला मिळालेली असल्यामुळे स्थानिक प्रशासनाने अवैध्य उत्खनन विरोधी कारवाई आणखी कडक करण्याचे संकेत दिले आहेत


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १४ डिसेंबर २०२५







## श्री संत सावता माळी महाविद्यालय, फुलंब्री या महाविद्यालयास नॅककडून 'अ' मानांकन दर्जा




**फुलंब्री** : पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय,फुलंब्री या महाविद्यालयाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय ऑडिट (अंकेक्षण) मध्ये 'अ' मानांकन हा उल्लेखनीय दर्जा प्राप्त झाला आहे. विद्यापीठाने प्रथमच NAAC द्वारे रचलेल्या मान्यता आणि मूल्यांकन फ्रेमवर्कच्या अनुषंगाने "ऑडिट फ्रेमवर्क" ची रचना केली. या चौकटीत अभ्यासक्रमाचे पैलू, अध्यापन, अध्ययन आणि मूल्यमापन, संशोधन, नवोपक्रम आणि विस्तार, पायाभूत सुविधा आणि अध्ययन संसाधने, विद्यार्थी समर्थन आणि प्रगती, प्रशासन, नेतृत्व आणि व्यवस्थापन , संस्थात्मक मूल्ये आणि सर्वोत्तम पद्धती आदी प्रमुख निर्देशकांवर महाविद्यालयांचे मूल्यांकन समाविष्ट होते. या यशाचे औचित्य साधून महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले व 'AAA' समन्वयक डॉ. विजय पांडे यांचे आभार मानले. महाविद्यालयाने सुरुवातीपासूनच शैक्षणिक गुणवत्ता, नावीन्यपूर्ण अध्यापनपद्धती, विद्यार्थी-अनुकूल वातावरण, सामाजिक बांधिलकी आणि विविध क्रियाकलापांमधील सातत्यपूर्ण प्रगती यावर विशेष भर दिला. याच प्रयत्नांची दखल घेत विद्यापीठाने ‘अ’ हा मानांकन दर्जा प्रदान केला असून, हे महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रवासातील एक महत्त्वपूर्ण असे पाऊल आहे. अध्यापन, संशोधन, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी अतोनात परिश्रम घेतले. यामुळेच आज आम्हाला हा सन्मान मिळाला आहे. यामुळे पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेची आणि प्रस्तुत महाविद्यालयाची पुढील वाटचाल अधिक गुणवत्तापूर्ण, पारदर्शक आणि विकासाभिमुख करण्याचा निर्धार असेल.महाविद्यालयाच्या सर्व समित्या व विभागांनी समन्वय साधत दस्तऐवजीकरण, मूल्यांकन, स्व-अभ्यास अहवाल तयारी आणि गुणवत्तावाढ प्रक्रियेत केलेल्या सहकार्य यामुळे हे शक्य झाले आहे.तसेच महाविद्यालयाला मिळालेला हा ‘अ’ दर्जा ही येथील शैक्षणिक निष्ठा, नियोजनबद्ध प्रयत्न आणि सातत्यपूर्ण गुणवत्तावाढ यांची पावती सिद्ध होते.या प्राप्त यशाबद्दल पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा राजस्थान राज्याचे महामहिम राज्यपाल मा. श्री हरिभाऊ बागडे (नाना), संस्थेचे उपाध्यक्ष, मा. श्री देवजीभाई पटेल, सचिव, मा. श्री निवृत्ती पाटील गावंडे, संचालक मा. श्री सर्जेराव ठोंबरे, पालक संचालक, मा. डॉ. प्रदीप जब्दे यांनी अभिनंदन केले. या यशासाठी सर्वत्र अभिनंदन होत आहे.या यशात श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील प्रा. डॉ. पांडुरंग कल्याणकर, प्रा. डॉ. राजश्री पवार, प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर, प्रा. डॉ. रामकिशन लोमटे, प्रा. डॉ. दत्तात्रय येडले, प्रा. डॉ. सुरेश मुंढे, प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ, प्रा. डॉ. गणेश कुलकर्णी, प्रा. डॉ. अश्विन रांजणीकर, प्रा. डॉ. महेश थोरात, प्रा. डॉ. नितीन माळेगावकर, प्रा. डॉ. संदीप जगताप, प्रा. डॉ. चंद्रनयन वाघमारे, प्रा. अरुण परदेशी, प्रा. स्वाती ढंगारे, प्रा. तुषार वानखडे, प्रा. रविंद्र चेपटे, प्रा.उज्ज्वला साबणे-शिंदे, श्री दयानंद कांबळे, श्री प्रेम चव्हाण, श्री बाबासाहेब दाभाडे, श्री विनोद तुपे, श्री रत्नाकर जाधव, श्री रमेश जगधने, श्री जयराम जाधव यांचा मोलाचा वाटा आहे.

## राज्य शासनाने मराठा आरक्षण कायदा करतांना घटनात्मक तरतुदी पाळल्या नाहीत



**प्रतिनिधी-(मुंबई)** महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाच्या ११ डिसेंबर २०२५ च्या मुंबई उच्चन्यायालया तील सुनावणीत मुख्य युक्तिवाद याचिका कर्त्यांच्या बाजूनेआरक्षणा च्या वैधतेवर केंद्रित होते.याचिका महाराष्ट्रा तील मराठा आरक्षणाच्या ११ डिसेंबर २०२५च्या मुंबई उच्च न्यायालयातील सुनावणीत मुख्य युक्तिवाद याचिका कर्त्यांच्या बाजूने आरक्षणा च्या वैधतेवर केंद्रित होते.जेष्ठ विधिज्ञ अनिल व्ही अंतूरकर यांनी याचिका कर्त्यांचे युक्तिवाद मांडताना याचिकाकर्त्यां च्या वकिलांनी मराठा समाजाला एस ई बी सी अंतर्गत १०% आरक्षण ओबीसी कोट्यावर अतिक्रमण करणारे असल्याचा दावा केला.राज्य शासनाने मराठा आरक्षण कायदा करतांना घटनात्मक तरतुदी पाळल्या नाहीतअसे स्पष्ट केले असुन पुढील सुनावणी १७ जानेवारी २०२६ रोजी दिवसभर होणार आहे.त्यांनी राज्य सरकारच्या निर्णयाला संविधानातील ५०% आरक्षण मर्यादेचे उल्लंघन आणि मराठ्यांना सामाजिक-शैक्षणिक आर्थिकदृष्ट्या मागासलेले नसल्याचे पुरावे सादर केले. सरकारची भूमिका राज्य सरकारने मराठा समाजाच्या सर्वेक्षणावर आधारित आर्थिक मागासलेपणाचा पुरावा मांडला आणि आरक्षण सामाजिक न्यायासाठी आवश्यक असल्याचे सांगितले.पुढील प्रक्रिया पूर्वीच्या सत्रात ओबीसी आरक्षणाशी संघर्ष आणि जनगणनेच्या गरजेवर चर्चा झाली. वकिलांनी मराठा समाजाला एस ई बी सी अंतर्गत १०% आरक्षण ओबीसी कोट्यावर अतिक्रमण करणारे असल्याचा दावा केला. त्यांनी राज्य सरकारच्या निर्णया ला संविधानातील ५०% आरक्षण मर्यादेचे उल्लंघन व मराठ्यांना सामाजिक-आर्थिकदृष्ट्या पिछडलेले नसल्याचे पुरावे सादर केले.मुळात वाढीव आरक्षण देण्या साठी घटना दुरुस्ती करावी लागेल आणि तो अधिकार केंद्र सरकारचा असुन राज्य सरकारला असा काही एक अधीकार नसल्यामुळे हे आरक्षण इंद्रा सहानी प्रकारणां तील निर्देशांचे उल्लंघन आहे. राज्य सरकारने मराठा समाजा च्या सर्वेक्षणावर आधारित आर्थिक मागासले पणाचा पुरावा मांडला आणि आरक्षण सामाजिक न्यायासाठी आवश्यक असल्याचे सांगितले. पुढील सत्रात ओबीसी आरक्षणाशी संघर्ष आणि जन गणनेच्या गरजेवर चर्चा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विधिज्ञ अनिल अंतूरकर यांचे काय म्हणणे आहे २०२५ चा लेखी याचिका मध्ये,वरिष्ठ वकील अनिल व्ही. अंतुरकर यांनी रिट याचिकेच्या प्रार्थना कलम १४(क) मध्ये मांडल्या प्रमाणे अंतरिम दिलासा मिळावा यासाठी चार बाजू मांडल्या. याचिकाकर्त्यांच्या वरिष्ठ वकिलांनी महाराष्ट्र अनु. जाती,अनुसूचित जमाती, विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्गीय व विशेष मागासवर्गीय प्रवर्ग (नियमनजारी करण्याचे आणि पडताळणीचे) जात प्रमाणपत्र कायदा, २००० (थोडक्यात, "२००० चा कायदा") अंतर्गत असलेल्या तरतुदी आणि विशेषतः, कलम २(अ) अंतर्गत "जातीप्रमाणपत्र", कलम २(एक) अंतर्गत "विहित" आणि कलम २(क) अंतर्गत "छाननी समिती" या अभिव्यक्तीं च्या व्याख्यांचा संदर्भ दिला.वरिष्ठ वकिलांनी २००० च्या कायद्याच्या कलम ३ आणि ४ अंतर्गत असलेल्या तरतुदींचा देखील संदर्भ दिला ज्या मध्ये सक्षम प्राधिकरणा द्वारे जात प्रमाणपत्रासाठी अर्ज कसा करावा आणि जात प्रमाणपत्र कसे जारी करावे हे सांगितले आहे.२ सप्टेंबर २०२५ च्या सरकारी ठरावालाअपवाद म्हणून,विद्वान वरिष्ठ वकिलांनी २००० च्या कायद्याच्या कलम १८ वर भर दिला जो सरकारला नियम बनवण्याचा अधिकार प्रदान करतो आणि असे सादर केले की मागील प्रकाशनाच्या अनिवार्य प्रक्रियेचे पालन न करता, भारतीय संविधानाच्या कलम १६२ अंतर्गत कार्यकारी अधिकारांचा वापर करून वादग्रस्त सरकारी ठराव जारी करण्यात आला आहे. या सादरी करणाला समर्थन देण्यासाठी, वरिष्ठ वकिलांनी "भोपाळ मनपा,एम.पी. विरुद्ध मिसबाहुल हसन आणि इतर", (१९७२) १ एससीसी ६९६ मधील निर्णयावर अवलंबून राहिले.वरिष्ठ वकिलांनी पुढे असेही नमुद केले की, भारतीय राज्य घटनेतील परिच्छेद १६२ चा सुद्धा भंग झाल्या चे नमुद केले आहे.पुढे असे सादर केले की एकदा हे क्षेत्र वैधानिक नियमांनी व्यापले की, सरकारला भारतीय संविधानाच्या कलम १६२ अंतर्गत वादग्रस्त सरकारी ठराव जारी करण्यासाठी त्याच्या अधिकारांचा वापर करण्याचे अधिकार रद्द केले जातील.याचिकाकर्त्यांचे वरिष्ठ वकील अनिल व्ही. अंतुरकर यांनी पुढे असे सादर केले होते की, भारतीय संविधानाच्या कलम ३३८ ब च्या कलम (९) अंतर्गत संवैधानिक आदेशाकडे दुर्लक्ष करून, सध्याच्या सारख्या प्रमुख धोरणात्मक निर्णयावर राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचा सल्ला न घेता महाराष्ट्र सरकारने हा सरकारी ठराव जारी केला आहे.वरिष्ठ वकिलांनी भारतीय संविधानाच्या कलम १६२ अंतर्गत कल्पना केलेल्या अधिकारांच्या विभाजना बाबत एक मुद्दा देखील उपस्थित केला.२०२५ याचिका मध्ये याचिका कर्त्यांचे वरिष्ठ वकील वेंकटेश धोंड यांनी उपस्थित केलेल्या भीतीला सामील असल्याचे त्यांनी नमुद केले होते. वरिष्ठ वकील अनिल व्ही. अंतुरकर यांच्या रिट याचिकेच्या कलम १४(क) अंतर्गत अंतरिम दिलासा देण्या साठी सादरीकरणांवर काम करत आहोत.२ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयाच्या वैधते बाबतचा मुद्दा,जो याचिका कर्त्याने रिट याचिकेत म्हटले आहे. हा २००० च्या अधिनियम आणि महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय आणि विशेष मागासवर्गीय वर्ग (जातींचे नियमन आणि पडताळणी) अंतर्गत अनिवार्य तरतुदींचे उल्लंघन करत जारी करण्यात आला आहे. प्रमाणपत्र नियम, २०१२ हा राज्य-प्रतिवादींकडून प्रतिसाद घेतल्यानंतरच निर्णय घेता येईल. या टप्प्यावर, राज्य सरकार च्या अधिकारांच्या वापराबद्दल कोणतेही निरीक्षण करण्यास तयार नसल्याचे त्यांनी नमुद केले होते.मान्यवर वकीलांचा सहभाग ॲड अरविंद दातार,ज्येष्ठ वकील अधिवक्ता गोपाल शंकर नारायणन वरिष्ठ अधिवक्ता प्रदीप संचेती, ॲड.पल्लवी बाली, आशिष मिश्रा, प्रथमेश कामत,यश ओझा,कु. निझिका पिंटो,विष्णुदत्त मिश्रा,अश्विन देशपांडे याचिका कर्त्या साठी तर निहार चित्रे आणि कु. त्रिशा चंद्रास ॲड सुभाष झा,हरे कृष्ण मिश्रा आणि सिद्धार्थ झा आणि अपेक्षा लॉ ग्लोबल, याचिकाकर्ता संजीत शुक्ला यांचे वकील ॲड प्रदीप संचेती,ॲड देशपांडे सह निहार चित्रे,अनिल अंतुरकर जेष्ठ वकील अथर्व हर्षवर्धन सुर्यवंशी आणि ॲड.कशिश चेलानी व कु.कविता प्रकाश ॲड गौरव चौबे याचिकाकर्त्या साठी ॲड.लुबना अन्सारी, राकेश जे.पांडे याचिकर्त्या साठी असुन राज्य मागास वर्ग आयोगाचे सर्व बाबीं मध्ये ॲड.साकेत मोने आणि अंचिता नायर आणि देवांश शहा विधी पक्षाचे सदस्य आहेत.ॲड बिरेंद्र बी सराफ,ए.जी.पी. काकडे,जीपी.ओ.ए. चांदूरकर,अतिरिक्त जी.पी,जय संकलेचा, श्रीमती जी.आर. रघुवंशी, एजीपी,राज्य/प्रतिनिधी, सर्व बाबीं मध्ये शासनाच्या वतीने वरिष्ठ वकील व्ही.ए.थोरात, वरिष्ठ वकील सुश्री प्राची तटके, विशेष वकील पी.पी. काकडे,जी.पी ओ. चांदुरकर,अतिरिक्त जी.पी श्रीमती जी.आर. रघुवंशी एजीपी राज्य/प्रतिनिधि दिन्यार, वरिष्ठ वकील चिराग शाह, मनिनी रॉय, श्यामसुंदर बी.ए जाधव, वरिष्ठ वकील वाय साखरे, उत्सव त्रिवेदी,अर्पित गुप्ता,आशिश कुमार यादव, विशाल आचार्य, ॲड रवी कदम, मनिनी रॉय, श्यामसुंदर बी.जाधव, सचिन पवार,आदर्श व्यास,रुचिता वर्मा,एकता ॲड.देवदत्त कामत,वरिष्ठ वकील हर्ष पांडे,हिमांशू सचदेवा पियुष तिवारी,उत्सव त्रिवेदी,अश्विनी बी.जाधव ॲड.एकता दळवी,कविता धानुका,ॲड.जनक द्वारकादास,वरिष्ठ अधिवक्ता नम्रता विनोद, पीयूष तिवारी व झल अंध्यार्जुन,वरिष्ठअधिवक्ता हिमांशू सचदेवा,पीयूष तिवारी, उत्सव त्रिवेदी,कु.मनिनी रॉय अर्पित गुप्ता आणि विशाल तसेच मराठा समाजाच्या वतीने मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ता डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या साठी ॲड.मधुर अनिल गोलेगावकर व ॲड.श्रेयस संजीव देशपांडे,ॲड सागर मडके हे कामकाज पहात असून,ॲड श्रीराम पिंगळे, ॲड सूर्यजीत चव्हाण, बजरंग सोळंके,विशाखा शेलार,ॲड रूपेश बोबडे, ॲड श्रद्धा नाकाडी,ॲड आशिष गायकवाड,ॲड रमेश दुबे,ॲड राजेश टेकाळे,ॲड अभिजीत पाटील या सह अनेक विधीज्ञ कामकाज पहात आहेत.मराठा समाजाला एसईबीसी कायद्याअंतर्गत दिलेलं आरक्षण आकलना पलिकडचं आहे.सर्वोच्च न्यायालयानं आरक्षणाची घालून दिलेली ५० टक्के मर्यादा मराठा आरक्षणा मुळे ओलांडली गेली आहे. इतकेच नव्हे तर मराठा आरक्षणा मुळे इतर समाजाच्याआरक्षणावर ही अतिक्रमण झाल्याचा दावा याचिकाकर्त्यां च्या वतीने हायकोर्टात करण्यात आला आहे.मराठा समाजाला नोकरी आणि शिक्षणात आरक्षण मिळावं या साठी राज्य सरकारने एसईबीसी कायदा तयार केला. या कायद्याच्या घटनात्मक वैधतेला हायकोर्टात आव्हान देण्यात आलंय तर मराठ्यांना आरक्षण मिळावं या साठीही याचिका दाखल करण्यात आल्या मराठा समाजा च्या वतीने मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ता डॉ.राजेंद्र दाते पाटील यांच्या वतीने ॲड मधुर गोलेगावकर व ॲड श्रेयस देशपांडे ॲड सागर मडके हे सहाय्क म्हणुन कार्यरत आहे. गेल्या अनेक सुनावणी साठी अगदी बोटावर मोजण्या एवढेच मराठा सेवक उपस्थित असल्याचे निरीक्षण आमचे प्रतिनिधिने केलेले असुन त्यात अनवानी राहणारे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील, प्राचार्य तांबे,प्रा. अंबादास मोहीते आदीच संपूर्ण वेळ मुंबई उच्च न्यायालयात नोंदी घेत उपस्थित असतात हे विशेष होय.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १४ डिसेंबर २०२५

# ऊर्जा संवर्धन : शाश्वत भविष्यासाठीची सामूहिक जबाबदारी

दरवर्षी 14 डिसेंबरला भारतात 'राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन' साजरा केला जातो. हा दिवस केवळ ऊर्जा बचतीच्या तांत्रिक चर्चा करण्यापुरता मर्यादित नाही; तर तो समाजाच्या एकूण जीवनशैलीतील, विकासाच्या नमुन्यातील, आर्थिक-सामाजिक असमानतेतील, पर्यावरणीय प्रश्नांतील आणि सांस्कृतिक आचरणातील खोलवर असलेल्या नात्यांची जाणीव करून देणारा दिवस आहे. ऊर्जा संवर्धन म्हणजे फक्त बल्ब बदला, उपकरणे बंद करा अशा पातळीवर पाहण्याचा विषय नाही; तर तो व्यापक अर्थाने समाजशास्त्रीय क्रांतीचा केंद्रबिंदू आहे. ऊर्जा ही आधुनिक समाजाची मूलभूत जीवनवाहिनी आहे. औद्योगिक प्रगती, शहरीकरण, तांत्रिक विकास, वाहतूक, कृषी, आरोग्य, शिक्षण, माहिती संचार व्यवस्था या सर्व क्षेत्रांचा पाया ऊर्जेवरच घडतो. त्यामुळे ऊर्जेचा अनावश्यक वापर, तिची अपुरी उपलब्धता, वाढती मागणी आणि पर्यावरणीय हानी हे सर्व घटक एकमेकांशी गुंतागुंतीने जोडलेले आहेत. या संदर्भात राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वाचा ठरतो, कारण तो आपल्याला विचार करायला भाग पाडतो की ऊर्जा वापराचा प्रश्न हा केवळ तांत्रिक नाही, तर समानता, न्याय, पर्यावरणीय शाश्वतता, राज्यकारभार, सामाजिक सवयी, सांस्कृतिक मूल्ये आणि सामूहिक जबाबदारी या व्यापक चौकटींशी संबंधित आहे.भारत सारखा जलद गतीने विकसित होणारा देश ऊर्जा वापराच्या सर्वाधिक असमतोल असलेल्या देशांपैकी एक मानला जातो. ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये ऊर्जा उपलब्धतेत स्पष्ट तफावत आढळते. शहरी मध्यमवर्गीय कुटुंबे एसी, रेफ्रिजरेटर, हिवाळी व गरमी व्यवस्थापन यंत्रणा, आधुनिक गृहोपयोगी साधने मोठ्या प्रमाणात वापरतात, तर अनेक ग्रामीण कुटुंबांना अद्याप स्वच्छ ऊर्जा, नियमित वीज पुरवठा किंवा परवडणारी उपकरणे मिळालेली नाहीत. हा सामाजिक अन्याय ऊर्जा संवर्धनाच्या चर्चेत महत्त्वाचा बनतो, कारण शाश्वततेचे ध्येय गाठण्यास समानता ही अनिवार्य अट आहे. ऊर्जा बचत ही सर्वांनी करायची असते; परंतु सर्वांना समान सुविधा दिल्याशिवाय ऊर्जा शिस्त शक्य नाही. एका बाजूला काही गट ऊर्जेचा अतिरेक वापर करत असताना, इतरांचा ऊर्जेवरील मूलभूत हक्कच बाधित होतो. त्यामुळे ऊर्जा संवर्धन ही सामाजिक पुनर्वाटपाचीही प्रक्रिया ठरते.ऊर्जेचा प्रश्न पर्यावरणीय न्यायाच्या चौकटीतही स्थान मिळवतो. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे, वाहनांमुळे, खनिज इंधनांवरील अवलंबित्वामुळे प्रदूषणाची पातळी वाढत चालली आहे. हवामान बदल ही केवळ पर्यावरणाची समस्या नाही, तर ती आरोग्य, कृषी, रोजगार, स्थलांतर, पाणीटंचाई, संसाधनांवर तणाव, सामाजिक संघर्ष आणि असमानता यांना थेट प्रभावित करते. उर्जा संवर्धन म्हणजे या सर्व समस्यांना रोखण्यासाठीची पहिली पायरी. ऊर्जा वापर नियंत्रित न केल्यास कार्बन उत्सर्जन वाढतच जाणार आणि त्याचे सर्वाधिक दुष्परिणाम समाजातील सर्वात दुर्बल घटकांवरच येणार. त्यामुळे ऊर्जा संवर्धन ही सामाजिक न्यायाची लढाई आहे. भविष्यातील पिढ्यांच्या जीवनमानाचे रक्षण करण्यासाठी आजच्या पिढीने तडजोड करण्याची बांधिलकी जपली पाहिजे.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ऊर्जा संवर्धन ही लोकांच्या दैनंदिन जीवनशैलीत परिवर्तन घडवून आणण्याची प्रक्रिया आहे. कोणत्याही धोरणाची यशस्वी अंमलबजावणी तेव्हाच शक्य होते जेव्हा सामान्य नागरिकांच्या मानसिकतेत, वर्तनामध्ये आणि मूल्य प्रणालीमध्ये बदल घडतो. भारतीय समाजात ऊर्जा वापराकडे बघण्याचा दृष्टिकोन अत्यंत वैविध्यपूर्ण आहे. काही कुटुंबे अजूनही विजेचा काटकसरीने वापर करतात, कारण खर्चाची मर्यादा किंवा वीजपुरवठ्याची अनियमितता त्यांना बचतीकडे ढकलते. दुसरीकडे, अधिक साधनसंपन्न कुटुंबे उपकरणांच्या प्रमाणात व वापरात वाढ करतात. येथे 'ऊर्जा संवर्धन मानसिकता' ही सामाजिक समतेशी जोडली जाते. समाजात ऊर्जा वापराबाबत जागरूकता समान नसल्यामुळे संवर्धनाचे प्रयत्न असमतोल राहतात. समाजशास्त्र सांगते की वर्तन बदल हा केवळ माहिती पुरवण्याने होत नाही; तर सामाजिक दबाव, उदाहरण, संस्कृती, परंपरा, आर्थिक प्रोत्साहन, सरकारी धोरणे आणि शैक्षणिक पद्धती यांच्या परस्परसंबंधातून घडतो. भारतात ऊर्जा बचत मोहिमा यशस्वी व्हाव्यात यासाठी नागरिकांमध्ये सामूहिकतेची भावना वाढवणे गरजेचे आहे. ऊर्जा संवर्धन हे एकट्याने करणारे काम नाही; ती सामूहिक शिस्त आहे. जसे रस्त्यावर वाहतूक नियम सर्वांनी पाळले तरच अपघात कमी होतात, तसेच ऊर्जा बचत तेव्हाच प्रभावी होते जेव्हा ती व्यापक सामाजिक नियम बनते.ऊर्जा क्षेत्रातील बदल हे तांत्रिक नवकल्पनांशीही जोडलेले आहेत. परंतु समाजशास्त्रीय दृष्टिकोन सांगतो की तंत्रज्ञानाचा स्वीकार हा सामाजिक रचनेवर अवलंबून असतो. एलईडी बल्ब, ऊर्जा कार्यक्षम उपकरणे, सौरऊर्जा पॅनेल, ऊर्जा बचत तंत्र या सर्व गोष्टी उपलब्ध होऊ शकतात; पण समाजात आर्थिक क्षमता, जागरूकता, शिक्षण, सांस्कृतिक मूल्ये, प्राधान्यक्रम यांमध्ये भेद असल्यामुळे या साधनांचा वापर सर्वत्र समान पातळीवर होत नाही. तांत्रिक प्रगती तेव्हाच प्रभावी ठरते जेव्हा ती सर्वांसाठी उपलब्ध आणि परवडणारी बनते. म्हणून सरकारचे 'ऊर्जा कार्यक्षमता ब्युरो' (BEE) व ऊर्जा संवर्धन कायदा 2001 ही तांत्रिक बाबींपलीकडे जाऊन सामाजिक स्तरावर बदल घडविण्याचा प्रयत्न करतात. 'ऊर्जा स्टार रेटिंग', 'उर्जा बचत योजना', एलईडीचे मोठ्या प्रमाणातील वितरण, सौरऊर्जा प्रकल्प, PM-KUSUM योजना, घरांमध्ये स्मार्ट मीटर बसवणे हे सर्व उपक्रम ऊर्जा बचतीला एका नवीन सामाजिक पातळीवर नेतात. शाश्वत ऊर्जेकडे वाटचाल करण्यासाठी ऊर्जेच्या वापराबाबत घराघरात वैज्ञानिक दृष्टी वाढवणे अत्यावश्यक आहे.ऊर्जा संवर्धनाच्या प्रश्नात ग्रामीण भारताचा सहभाग विशेष महत्त्वाचा आहे. ग्रामीण भागातील ऊर्जा वापराचे स्वरूप शहरी भागापेक्षा वेगळे आहे. अनेक ग्रामीण कुटुंबांच्या जीवनात अजूनही पारंपरिक इंधनांचा वापर आढळतो. तथापि, सौरऊर्जा, जैवऊर्जा, लघु जलविद्युत प्रकल्प यांसारख्या साधनांमुळे ग्रामीण भाग भारताच्या ऊर्जा क्रांतीचे नवीन केंद्र बनू शकतो. ग्रामीण भागातील स्वयंसहाय्य गट, ग्रामपंचायत, सहकारी संस्था, महिला मंडळे, शालेय विद्यार्थी या सर्वांचा सहभाग ऊर्जा संवर्धनाच्या कार्यक्रमात निर्णायक ठरतो. ग्रामीण महिलांचे याबाबत योगदान लक्षणीय आहे. इंधनाची बचत, स्वच्छ ऊर्जा वापर, स्वयंपाकातील सुधारित चुली, सौरदिवे, कुटुंबाला शिकवलेली ऊर्जाबचत संस्कृती यातून ऊर्जा संवर्धनाचे प्रभावी सामाजिक नेटवर्क तयार होते. ग्रामीण भागात ऊर्जा बचत म्हणजे फक्त खर्चात बचत नाही, तर आरोग्य, पर्यावरण, आर्थिक स्वतंत्रता आणि जीवनमान उंचावण्याची प्रक्रिया आहे.ऊर्जा संवर्धनाचा प्रश्न शिक्षण क्षेत्राशीही घट्ट जोडलेला आहे. शिक्षण संस्थांमध्ये ऊर्जा बचतीबाबत अभ्यासक्रम, प्रकल्प, शालेय उपक्रम, 'ऊर्जा क्लब', सौरऊर्जेच्या वापराची प्रात्यक्षिके हे सर्व विद्यार्थीवर्गात शाश्वत विचार रुजवतात. पर्यावरणीय शिक्षणाचा वैचारिक पाया जितका मजबूत असेल तितकी भावी पिढी ऊर्जा बचत, पुनर्नवीकरणीय ऊर्जा, कार्बन फूटप्रिंट, हवामान बदल यांसारख्या संकल्पनांबाबत अधिक सजग राहील. शिक्षणातून विकसित झालेली विचारशैली समाजाला दीर्घकालीन ऊर्जा संस्कृती प्रदान करते. त्यामुळे शिक्षणक्षेत्राचे योगदान ऊर्जा संवर्धनातील सर्वात प्रभावी गुंतवणूक मानली जाऊ शकते.ऊर्जा बचतीच्या संदर्भात सामाजिक वर्तन आणि सांस्कृतिक पद्धती यांचा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा आहे. भारतीय समाजात "बचत" ही सांस्कृतिक मूल्य प्रणालीचा भाग आहे. पूर्वी अनेक घरांमध्ये कमी प्रकाशात अभ्यास, कमी उर्जेच्या साधनांनी स्वयंपाक, पाण्याचे काटेकोर नियोजन, कमी वापरातही समाधानाने जगणे अशा सवयी प्रचलित होत्या. आधुनिक जीवनशैलीच्या विस्तारामुळे विलासी वापराची प्रवृत्ती वाढली आणि ऊर्जेच्या खपात झपाट्याने वाढ झाली. परंतु आता पुन्हा ऊर्जा शिस्तीकडे वळणे ही काळाची गरज आहे. सांस्कृतिकदृष्ट्या 'ऊर्जा बचत ही नैतिक जबाबदारी' अशी भावना समाजात वाढवणे आवश्यक आहे. ही भावना व्यक्तीगणिक नव्हे तर सामूहिक स्वरूपात निर्माण झाली की ऊर्जा संवर्धन आत्मीयतेने अंगीकारले जाईल. समाजशास्त्र सांगते की समाजातील मूल्यांचे परिवर्तन व्यक्ती, संस्था, राज्य आणि समुदाय यांच्या परस्परसंवादातून घडते. त्यामुळे ऊर्जा बचत ही केवळ सरकारी उपक्रमापर्यंत मर्यादित न राहता, ती सामाजिक आंदोलन होणे गरजेचे आहे.ऊर्जा संवर्धनाचे आर्थिक पैलूही तितकेच महत्त्वाचे आहेत. ऊर्जा आयातीवरील वाढता खर्च, इंधन दरांतील चढ-उतार, उद्योगांची ऊर्जा-आधारित उत्पादन संरचना, शहरी पायाभूत सुविधांवरील दडपण, आर्थिक असमानता या सर्व गोष्टी भारताच्या विकास योजनांवर परिणाम करतात. जर ऊर्जा बचत वाढली तर देशाचा परकीय चलन खर्च कमी होईल, उद्योगक्षेत्र स्पर्धात्मक बनेल, शाश्वत रोजगार निर्मिती होईल, ग्रामीण व शहरी भागातील ऊर्जा उपलब्धता सुधारेल, आणि आर्थिक पातळीवर देश अधिक स्थिर बनेल. म्हणून ऊर्जा संवर्धन ही केवळ पर्यावरणीय नव्हे तर आर्थिक क्रांतीचीही पायरी आहे.ऊर्जा संवर्धन ही राजकीय धोरणांचीही कसोटी आहे. ऊर्जा धोरणे, नियम, पायाभूत सुविधा, कर प्रणाली, प्रोत्साहन योजना, नूतनीकरणीय ऊर्जेला प्रोत्साहन, नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी या सर्व गोष्टी शासनाच्या प्रभावी कार्यपद्धतीवर अवलंबून असतात. शासनाने ऊर्जा बचतीसाठी कडक नियम केले आणि नागरिकांनी त्यांचे पालन केले तरच ऊर्जा सुरक्षिततेचे ध्येय साध्य होईल. 'ऊर्जाक्षेत्रातील पारदर्शकता', 'ऊर्जा कार्यक्षमतेच्या मानकांची सक्ती', 'प्रदूषण नियंत्रणाच्या धोरणांची काटेकोर अंमलबजावणी', 'ऊर्जा क्षेत्रातील नाविन्यपूर्ण संशोधनासाठी गुंतवणूक' हे घटक ऊर्जा संवर्धनाला गती देतात. शासन आणि नागरिक यांचे नाते जितके मजबूत, तितके ऊर्जा बचतीचे धोरण यशस्वी होते.पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. जागतिक तापमानवाढ, पर्जन्यमानातील अस्थिरता, दुष्काळ-पुरांचे प्रमाण, हवामान आपत्ती, जैवविविधतेचा ऱ्हास या सर्व गोष्टींचे मूळ मानवी क्रियाकलापांमध्ये आणि त्यासाठी लागणाऱ्या ऊर्जेच्या अनियंत्रित वापरात आहे. पर्यावरणीय असमतोल समाजातील दुर्बल घटकांना अधिक असुरक्षित बनवतो. लहान शेतकरी, आदिवासी समाज, किनारी भागातील जनता, महिलांवर अवलंबून असलेला घरगुती श्रमवर्ग यांना हवामान बदलाचा सर्वाधिक फटका बसतो. अशा वेळी ऊर्जा संवर्धन ही हवामान न्यायाची कृती ठरते. ऊर्जा बचत म्हणजे पर्यावरणाचे रक्षण, समाजातील दुर्बलांना संरक्षण, भविष्यातील पिढ्यांबद्दल कर्तव्य पार पाडणे आणि पृथ्वीच्या अस्तित्वाला योगदान देणे.ऊर्जा संवर्धनाला समाजातील अनेक घटकांचा सहभाग आवश्यक आहे. कुटुंब, शाळा, स्वयंसेवी संस्था, माध्यमे, उद्योगक्षेत्र, ग्रामपंचायती, शहर विकास संस्था, धार्मिक समूह, स्थानिक समुदाय या सर्वांनी केलेला प्रयत्न ऊर्जा संवर्धनाला जनआंदोलनाचा स्वर देऊ शकतो. माध्यमांची भूमिका विशेष महत्त्वाची आहे कारण ते ऊर्जा बचतीबाबत वस्तुनिष्ठ माहिती आणि प्रेरक उदाहरणे समाजापर्यंत पोहोचवतात. उद्योगक्षेत्राने CSR अंतर्गत ऊर्जा कार्यक्षमतेसाठी विशेष गुंतवणूक करणे गरजेचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्था पर्यावरणपूरक पायाभूत व्यवस्था विकसित करू शकतात. समाजातील मतप्रवर्तक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते यांच्या माध्यमातून ऊर्जा संवर्धनाची संस्कृती अधिक वेगाने रुजवली जाऊ शकते.अखेरीस, राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन हा केवळ दिवस साजरा करण्याचा कार्यक्रम नाही; तर तो बदलत्या जगात आपली सामूहिक जबाबदारी स्मरण करून देणारा मूल्यवान क्षण आहे. ऊर्जा बचतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक आणि समाजशास्त्रीय असायला हवा. जीवनशैलीतील साधेपणा, उपभोग मर्यादा, पर्यावरणाबद्दलची संवेदनशीलता, संसाधनांचा न्याय्य वापर, आर्थिक समता, सामाजिक जबाबदारी या सर्वांपासून ऊर्जा संवर्धनाची खरी सुरुवात होते. आजच्या पिढीने ऊर्जा बचतीचे तत्त्व स्वीकारले तरच उद्याच्या पिढीसाठी सुरक्षित, शाश्वत, न्याय्य आणि पर्यावरणपूरक भविष्य घडवता येईल. ऊर्जा संवर्धन म्हणजे केवळ तांत्रिक उपायांची यादी नसून तो मानवी जीवनातील मूल्यांच्या पुनर्रचनेचा, सामाजिक असमानतेच्या निराकरणाचा, पर्यावरणीय संतुलनाच्या पुनर्स्थापनेचा आणि आर्थिक-राजकीय प्रणालीच्या सुजाण वापराचा एकत्रित मार्ग आहे. म्हणूनच ऊर्जा संवर्धन हा सगळ्यांचा निश्चय, सामूहिक जबाबदारी आणि भविष्यासाठीचे वचन असायला हवे, कारण ऊर्जा वाचविणे म्हणजेच पृथ्वी वाचविणे होय.आपण सर्वांनी या राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिनानिमित्त ऊर्जा बचत ही केवळ गरज नाही, तर जीवनपद्धती बनवण्याचा संकल्प करूया.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
केवळ संदेशासाठी मो. 9960103582,
bagate.rajendra५@gmail.com